जा.क्र./अपोआ/वाह/नियोजन/ २६०९९५ /२०२३

वाहतुक नियंत्रण अधिसुचना दिनांक - १३ /०७/२०२३

पिंपरी चिंचवड क्षेत्रात औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत असल्याने शहराचा विस्तारदेखील वेगाने होत आहे. चाकण, तळेगाव एमआयडीसीमध्ये तसेच तळवडे, हिंजवडी आयटी क्षेत्रात काम करण्यासाठी कात्रज ते रावेत तसेच रावेत ते कात्रज असा पुणे-मुंबई व मुबई पुणे या राष्ट्रीय माहामार्गाचा वापर करत असुन सदर मार्गावर मुंबई बाजुकडुन पुणे बाजुकडे व पुणे बाजुकडुन मुंबई बाजुकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असुन त्याव्यतीरीक्त त्यात तळेगाव, चाकण तसेच तळवडे, हिंजवडी आयटी मध्ये काम करणाऱ्या लोकांच्या वाहनांचा अतिरीक्त भार पडत असुन वाहतूक कोंडी होत असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी वसंत परदेशी भा.पो.से., अप्पर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

## तळवडे वाहतूक विभाग

१.त्रिवेणीनगर ते तळवडे गांवठाण ते आय.टी पार्क चौक ते महिंद्रा कंपनी चाकणकडे जाणाऱ्या रोडवर तसेच चाकण कडुन तळवडे आयटी पार्क मार्गे त्रिवेणीनगर कडे येणाऱ्या जड/अवजड वाहनांना सकाळी ०८.००ते ११.०० व दुपारी १७.०० ते २१.००वा.पर्यंत या वेळेत प्रवेश बंद .

२. परंडवाल चौक -खंडेलवाल चौक- आय टी पार्क चौक तळवडे गांवठाण -चिखली गांवठाण-डायमंड चौक रामकृष्णहरी चौकाकडे येणाऱ्या तसेच रामकृष्णहरी चौकाकडुन आय टी पार्क चौक तळवडे गांवठाण मार्गे परंडवाल चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सकाळी ०८.००ते ११.०० व दुपारी १७.०० ते २१.००वा.पर्यंत या वेळेत जड/अवजड वाहनांना प्रवेश बंद

३.डायमंड चौक ते कुदळवाडी ब्रीजकडे जाणाऱ्या व कुदळवाडी ब्रीज ते डायमंड चौकाकडे येणाऱ्या रस्त्यावर सकाळी ०८.००ते ११.०० व दुपारी १७.०० ते २१.००वा या वेळेत जड/अवजड वाहनांना प्रवेश बंद

४.कृष्णा चौक - साने चौक - नेवाळेवस्ती - डावीकडुन पिंगळे चौक- सोनवणे वस्ती- ज्योतिबानगर चौका दरम्यान जाणे-येणेच्या मार्गावर सकाळी ०८.००ते ११.०० व दुपारी १७.०० ते २१.००वा.पर्यंत जड वाहनांस प्रवेश बंद

## निगडी वाहतूक विभाग

१.भक्ती शक्ती चौकाकडुन ते त्रिवेणीनगर चौकाकडे जाण्यास जड/अवजड वाहनांना सकाळी ७.०० ते १२.०० व १७.०० ते २१.०० वा दरम्यान प्रवेश बंद

२.तळवडे रोडकडुन ते भक्ती शक्ती चौकाकडे व त्रिवेणीनगर कडे जाण्यास जड/अवजड वाहनांना सकाळी ७.०० ते १२.०० व १७.०० ते २१.०० वा दरम्यान प्रवेश बंद

३. दुर्गाचौकाकडुन ते टिळक चौकाकडे जाणारे जाण्यास जड/अवजड वाहनांना सकाळी ७.०० ते १२.०० व १७.०० ते २७10.०० वा दरम्यान प्रवेश बंद

४. थरमॅक्स चौककडुन ते खंडोबामाळ चौकाकडे जाण्यास जड/अवजड वाहनांना सकाळी ७.०० ते १२.०० व १७.०० ते २१.०० वा दरम्यान प्रवेश बंद

५. चिखली पो स्टे ते शाहुनगर चौक ते केएसबी चौक जाण्यास जड/अवजड वाहनांना सकाळी ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० वा दरम्यान प्रवेश बंद

६. डी.वाय.पाटील ते हॅगिंगकडे जाताना रोडलगत जाण्यास जड/अवजड वाहनांना सकाळी ७.०० ते १२.०० व १७.०० ते २१.०० वा दरम्यान प्रवेश बंद

७.संभाजी चौक ते खंडोबामाळ चौक जाण्यास जड/अवजड वाहनांना सकाळी ८.०० ते १२.०० व १७.०० ते २१.०० वा दरम्यान प्रवेश बंद

Scanned with CamScanner

## चिंचवड वाहतूक विभाग

१.रिव्हर व्हयु चौक कडुन महावीर चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक कडे जड व अवजड वाहतुकीस सकाळी.०९.०० ते ११.०० वा. पर्यंत तसेच सायं.१७.०० ते २१.०० वा. पर्यंत प्रवेश बंद

## भोसरी वाहतूक विभाग

१. भोसरी ओव्हर ब्रिजचे सुरवातीला जायका चहा ते पिएमटी चौक भोसरी तसेच पिएमटी चौक भोसरी ते भोसरी ओव्हर ब्रिज जवळील अशोका हॉटेल पर्यंत जड/अवजड वाहनांना ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० प्रवेश बंद

२. माईवडे वाले चौक ते बनाचा ओढा तसेच बनाचा ओढा ते माईवडे वाले चौक जड/अवजड वाहनांना ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० प्रवेश बंद

३. जय भारत चौक (वैशाली स्वीट सेंटर चौक) ते आनंदनगर कॉसमॉस सोसायटी दरम्यान जड/अवजड ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० प्रवेश बंद

४. नाशिकफाटा चौक ते हॅरीष ब्रिज व हॅरीष ब्रिज ते नाशिकफाटा चौक दरम्यान सर्व प्रकारच्या जड/अवजड/ट्रव्हल्स बसेस यांना ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० वा दरम्यान प्रवेश बंद

## हिंजवडी वाहतूक विभाग

१) वाकड ब्रिज वरुन व वाकड नाका येथुन इंडीयन ऑईल चौकाकडे जाण्यास सर्व प्रकारच्या जड/अवजड वाहनांना सकाळी ०८.०० ते १२.०० वाजेपर्यंत व सायंकाळी १७.०० ते २२.०० वाजेपर्यंत प्रवेश बंद

२) मुबई बेंगलोर महामार्गावरुन मायकार शोरुम येथुन डावीकडे वळुन हिंजवडी आयटी पार्क मध्ये जाण्यास सर्व प्रकारच्या जड/अवजड वाहनांना सकाळी ०८.०० ते ११.०० वाजेपर्यंत व १७.०० ते २१.०० वाजेपर्यंत प्रवेश बंद

## सांगवी वाहतूक विभाग

१) राजीव गांधी पूल -रक्षक चौक मार्गे – काळेवाडी फाटा उड्डाणपुल व काळेवाडी फाटा उड्डाणपुल रक्षक चौक मार्गे - राजीव गांधी पूल या रस्त्यावर सकाळी ०८.०० ते ११.०० व सायं. १७.०० ते २१.०० वा पर्यंत या वेळेत जड वाहनांना व ट्रॅव्हल्स बसेसला प्रवेश बंदी

२) काळेवाडी फाटा ते तापकीर चौक मार्गे एम. एम. चौक एम्पायर ईस्टेट या दरम्यानचे जाणा-या व येणाऱ्या रस्त्यावर सकाळी ०८.०० ते ११.०० व सायं. १७.०० ते २१.०० वा पर्यंत या वेळेत जड वाहनांना व ट्रॅव्हल्स बसेसला प्रवेश बंदी

३) कस्पटे चौक ते सांगवी वाहतूक विभाग हद्दीतील सावित्रीबाई फुले चौक मार्गे - शिवार चौक - कोकणे चौक मार्गे - म्हसोबा चौक नाशिक फाटा कडे जाणा-या व येणाऱ्या रोडवर सकाळी ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० वा. वा पर्यंत या वेळेत जड वाहनांना व ट्रॅव्हल्स बसेसला प्रवेशबंदी

४) म्हसोबा चौक मार्गे पिंपळे गुरवकडे जाणा-या दरम्यानचे रस्त्यावर व सांगवी फाटयाकडून सांगवी गावात जाणा-या दरम्यानचे रस्त्यावर सायंकाळी १७.०० ते २१.०० वा. पर्यंत या वेळेत जड वाहनांना व ट्रॅव्हल्स बसेसला प्रवेश बंद

## वाकड वाहतूक विभाग

१)वाकडनाका ते कस्पटे चौककडे जाणाऱ्या व येणाऱ्या मार्गावर जड वाहनांस प्रवेश बंद.
२)बिर्ला हॉस्पीटल ते भुमकर चौककडे जाणाऱ्या व येणाऱ्या मार्गावर जड वाहनांस प्रवेश बंद.
३)जिंजर हॉटेल येथून सर्व्हिस रोडने भुमकर चौककडे येण्यास जड वाहनांस प्रवेश बंद.
४)मायकार शोरुम येथून भुमकर चौककडे सर्व्हिसरोड येण्यासजड वाहनांस प्रवेश बंद.
५)शनिमंदिर येथून सर्व्हिसरोडने भुमकर चौककडे येण्यास जड वाहनांस प्रवेश बंद.
६)जॅगवार शोरुम येथून भुमकरचौककडे येण्यासजड वाहनांस प्रवेश बंद.
७)वाकडगाव चौकाकडून दत्तमंदिर रोड वाकड कडे येण्यास जड वाहनांस प्रवेश बंद.
८)तापकीर चौक ते थेरगाव फाटा येथील थेरगाव मधील रोडला जड वाहनांस प्रवेश बंद.

वाकड वाहतूक विभाग हद्दीतील वर नमुद अनु.क्र. १ ते ८ मार्गावर जड/अवजड वाहनांना सकाळी ०७.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० वाजे दरम्यान प्रवेश बंद करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

## बावधन वाहतूक विभाग

१.सुसखिंड (सुसब्रिज) ते नांदे गाव व नांदे गाव ते सुसखिंड (सुसब्रिज) जाणे-येण्यास सकाळी ०८.०० ते ११.०० वाजे पर्यंत व १७.०० ते २१.०० वा चे दरम्यान जड/अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

## पिंपरी वाहतूक विभाग

१.पिंपरी चौकाकडुन पिंपरी पुलावर आलेनंतर डावीकडे वळताना व शगुन चौकाकडे जाताना जड/अवजड वाहनांना सकाळी ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० वाजे दरम्यान प्रवेश बंद करण्यात येत आहे.

२.भाटनगर कॉर्नर या ठिकाणी मेन बाजारामध्ये जाताना जड/अवजड वाहनांना सकाळी ०८.०० ते १२.०० व १७.०० ते २१.०० वाजे दरम्यान प्रवेश बंद करण्यात येत आहे.

३.शगुन चौक ते साई चौक आर्य समाज चौक ते कराची चौक, शगुन चौक ते डिलक्स चौक काळेवाडी पुलापर्यंत कराची चौक ते आंबेडकर रोड (रिव्हर रोड ) भाटनगर पर्यंत जड/अवजड वाहनांना सकाळी ०८.०० ते १२.०० व १७.०० ते २१.०० वाजे दरम्यान प्रवेश बंद करण्यात येत आहे.

४.साई चौक ते गेलार्ड चौक या रस्त्यावर जड/अवजड वाहनांना सकाळी ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० वाजे दरम्यान प्रवेश बंद करण्यात येत आहे.

## दिघी आळंदी वाहतूक विभाग

१.देहुफाटा चौक ते चाकण चौक दरम्यान जड/अवजड वाहनांना जाणे-येणेस सकाळी ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० वाजे दरम्यान प्रवेश बंद करण्यात येत आहे.

२.चाकण चौक ते वडगाव चौक दरम्यान जड/अवजड वाहनांना जाणे-येणेस सकाळी ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० वाजे दरम्यान प्रवेश बंद करण्यात येत आहे.

३.वडगाव चौक ते मरकळ चौक दरम्यान जड/अवजड वाहनांना जाणे-येणेस सकाळी ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० वाजे दरम्यान प्रवेश बंद करण्यात येत आहे.

४.मरकळ चौक ते देहुफाटा दरम्यान जड/अवजड वाहनांना जाणे-येणेस सकाळी ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० वाजे दरम्यान प्रवेश बंद करण्यात येत आहे.

## देहुरोड वाहतूक विभाग

१.स्वामी चौकातुन देहुरोड बाजारात व सवाना चौकातुन देहुरोड बाजारात जड/अवजड वाहनांना सकाळी ०८.०० ते ११.०० व १७.०० ते २१.०० वा पर्यंत प्रवेश बंद

तरी वर नमुद रस्त्यांवर जड/अवजड/ट्रव्हल्स बसेस यांना पुढील आदेशापर्यंत प्रवेश बंदी करणेबाबत आदेश (नोटीफिकेशन) काढण्यात येत आहे.

(वसंत परदेशी भा.पो.से)
अप्पर पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी संबंधीत वाहतुक विभाग
२/- सदर बाबत संबंधीत कार्यकारी अभियंता यांचे कडुन जड वाहनांना प्रवेश बंद बाबत साईनेज लावुन पुर्तता करुन घ्यावे.

४) कार्यकारी अभियंता, अ,ब,क,ड,ई,फ,ह क्षेत्रीय कार्यालय, पिंपरी चिंचवड ,
२/-सदर ठिकाणी वाहतूक निर्बंधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner